# निर्यात सुविधा केंद्र, मॉडर्न मार्केट सुविधा, फुले निर्यात सुविधा केंद्र भाडेतत्वावर देणेकरीता  प्रस्ताव सादर करणे

(REQUEST FOR PROPOSAL)

महाराष्ट्र राज्य  कृषि पणन मंडळ,
प्लॉट नं. आर ७, मार्केट यार्ड,
गुलटेकडी, पुणे ४११०३७
फोन नं. ०२०/२४५२८१००, २४५२८२००
ईमेल  - project@msamb.com

# अनुक्रमणीका


| अ.क्र. | घटक | पान नंबर |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | पात्रतेचे निकष | ३ |
| ३ | निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती | ४ |
| ४ | निविदा धारक (खाजगी भागीदार) निवडीचे निकष | ६ |
| ५ | प्रस्ताव सादर करणे | ७ |
| ६ | प्रिबीड बैठक | ७ |
| ७ | प्रस्ताव सादर करणेची अंतिम तारीख | ७ |
| | सूची – १ अर्जाचा नमुना | ८ |
| | सूची – २ आर्थिक प्रस्ताव | ९ |
| | सूची – ३ सुविधांची यादी | १० |

# निर्यात सुविधा केंद्र, मॉडर्न मार्केट सुविधा, फुले निर्यात सुविधा केंद्र भाडेतत्वावर देणेकरीता प्रस्ताव सादर करणे

## (REQUEST FOR PROPOSAL)

---

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च, १९८४ रोजी झाली. कृषी पणन मंडळ हे राज्यातील कृषी मालाच्या पणन व्यवस्थेच्या विकासासाठी प्रयत्नशील असून या क्षेत्रात पणन मंडळान विविध कार्ये केली आहेत. कृषी पणन मंडळाने राज्यातील पणन व्यवस्थेत मजबूती आणणे, सुसुत्रता आणि समन्वय साधण्याच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी केलेली आहे.

पणन मंडळाने निर्माण केलेली सुविधा केंद्रे (प्रकल्प) चालवा (Operate), देखरेख (Maintain) आणि हस्तांतरण (Transfer) तत्वावर भाड्याने देणेचे प्रयोजले आहे. त्याकरीता कंपनी / व्यक्ती / सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /खाजगी भागीदार निवडीसाठी निविदा प्रक्रिया अंमलात आणणेचा निर्णय घेतला आहे. सदरच्या सुविधा "ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत" (as is where is basis) निवड प्रक्रियेतुन निवडलेल्या कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदारास चालविणे व देखभाल करणेकरीता हस्तांतर करण्यात येणार आहेत.

पणन मंडळाने निर्माण केलेल्या सुविधा चालविणे व देखभाल करणेकरीता कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदार निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सुविधांची सविस्तर माहिती सुची - ३ मध्ये नमुद केली आहे.

## २. पात्रतेचे निकष

१. कोणतीही खाजगी कंपनी, फर्म, शेतकरी, निर्यातदार, कोणतीही व्यक्ती, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट, बाजार समिती इ. या प्रक्रियेत भाग घेणेस पात्र आहेत.

२. निविदा धारकास प्रस्ताव सादर करताना प्रक्रिया फी म्हणुन रु. ५०००.०० डी.डी च्या स्वरुपात

जमा करावे लागतील.

३. निविदा धारकास निविदेबरोबर रु. २ लाख Earnest Money Deposit (EMD) डी.डी. च्या स्वरुपात जमा करावी लागेल. यावर कोणतेही व्याज मिळणार नाही.

## ३. निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती

१. सुविधा प्रथम ३ वर्षाकरीता चालवा, देखरेख करा व सुस्थितीत पणन मंडळास हस्तांतर करणे या तत्वावर कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदारास देणेत येतील. दर ३ वर्षांनी करारनाम्याचा आढावा घेवून कराराचा कालावधी परस्पर संमतीने जास्तीत जास्त १० वर्ष मुदतवाढ देता येईल.

२. १० वर्षानंतर पुन्हा निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल.

३. कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदारास ६ महिन्याची पुर्व सुचना देवुन करारनामा रद्द करणेची मुभा देणेत येईल.

४. निविदेद्वारे निवडलेल्या कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदाराने दरवर्षी वार्षिक भाडे आगाऊ (Advance) जमा करावे लागेल. तसेच चालु वर्षाची मुदत संपणेचे अगोदर ३० दिवस पुढील वर्षाचे भाडे जमा करावे लागेल. जर आगाऊ भाडे जमा केले नाहीतर पणन मंडळामार्फत सुविधा तात्काळ ताब्यात घेणेत येईल.

५. निवड झालेल्या कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदारास पणन मंडळाकडे खालीलप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझीट म्हणुन जमा करावे लागतील.

| सूची ३ मधील सुविधांच्या यादीप्रमाणे | सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|
| अ.क्र १ ते ६ निर्यात सुविधा केंद्रासाठी | रक्कम रु.५ लाख |
| अ.क्र ७ ते १५ आधुनिक सुविधा केंद्रासाठी | रक्कम रु.३ लाख |

या रकमेवर कोणत्याही स्वरुपाचे व्याज मिळणार नाही. सदरचे सिक्युरिटी डीपॉझीट निर्यात सुविधा केंद्र सुस्थितीत पणन मंडळास परत केल्यानंतर संबधित भाडेकरुस परत करणेत येईल.

६. १० वर्षाच्या कालावधीत सुविधांवरील सर्व प्रकारचा भांडवली तसेच महसुली खर्च कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदाराने करावयाचा आहे.

७. सदरच्या सुविधा जश्या आहेत त्या स्थितीत हस्तांतर करणेत येतील.

८. सुविधा केंद्रावर जर अतिरिक्त यंत्रसामुग्री किंवा बांधकाम करावयाचे असल्यास ते पणन मंडळास पुर्व कल्पना देवून करता येईल. तसेच भाड्याचा कालावधी (१० वर्ष) संपल्यानंतर त्याची घसारा किंमत बांधकाम ज्यावर्षी केले आहे त्यावर्षीच्या डी.एस आर. प्रमाणे निश्चित करुन (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार) काढली जाईल व त्यानुसार इतर काही देणी असल्यास ती वजा करुन किंमत अदा करणेत येईल.

९. करारनामा संपल्यानंतर निवडलेल्या कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदारास संबधीत सुविधा सुस्थितीत, वापरणेयोग्य अवस्थेत पणन मंडळास अतिरिक्त उभारलेल्या सुविधां व यंत्रसामुग्री सह परत करावी लागणार आहे. जर पणन मंडळाच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेस नुकसान झाले असल्यास त्याची रक्कम करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझीटमधुन वसुल करुन घेण्यात येईल.

१०. प्रकल्पाचा वापर केवळ फळे, भाजीपाला व फुले या कृषिमालासाठी करता येईल. यासुविधा मांसजन्य व दुग्धजन्य पदार्थाकरीता वापरता येणार नाहीत.

११. राज्यातील अंमलात असणारे किंवा पुढे अंमलात येणारे कृषि पणन विषयक तसेच इतर लागू असेलले सर्व कायद्यांचे व नियमांचे पालन करणे कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदारास बंधनकारक आहे.

१२. संबंधित सुविधेचे शासकीय कर (जसे मालमत्ता कर, पाणीपट्टी, अकृषक कर इ. ) तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचे करअदा करण्याची जबाबदारी कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदार यांची राहील.

१३. सुविधेवरील इलेक्ट्रॉनिक वजनकाटे आणि भुईकाटे यांचे वजनमापे निरिक्षक यांचेकडून प्रमाणिकरण करुन घेण्याची जबाबदारी कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदाराची राहील.

१४.सुविधेतील कृषि मालाचा तसेच सुविधेवरील कर्मचा-यांचा विमा उतरविणेची जबाबदारी कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदाराची राहील. याबाबत पणन मंडळ कोणत्याही बाबतीत जबाबदार राहणार नाही.

१५.पणन मंडळास प्रत्येक महिन्यास सुविधेवरुन प्रक्रिया केलेल्या मालाचे सविस्तर विवरण देणे बंधनकारक आहे. तसेच पणन मंडळाच्या व पणन मंडळाने सुचित केलेल्या अधिका-यास सुविधेमध्ये मालमत्ता तपासणे इ. करीता प्रवेश देणे बंधनकारक आहे.

१६. तसेच याकरीता पणन मंडळाच्या MIS सिस्टीमशी सुविधेची उलाढाल लिंक करणेत येईल. याबाबतची विहीत वेळेत माहीती भरणेची जबाबदारी कंपनी / व्यक्ती /निर्यातदार/ सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी गट /बाजार समिती /खाजगी भागीदाराची राहील.

१७.सदरच्या निविदा प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करणे किंवा एखादी निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा सर्वस्वी अधिकारी पणन मंडळास राहील.

## ४. निविदा धारक (खाजगी भागीदार) निवडीचे निकष

१. जो निविदा धारक प्रति वर्ष जास्तीत जास्त भाडे देईल त्याची निवड करणेत येईल.

२. वार्षिक भाड्यामध्ये दरवर्षी गतवर्षाच्या भाड्यात १० टक्के वाढ करणेत येईल.

**५. प्रस्ताव सादर करणे**

निविदा धारकांस एकापेक्षा जास्त सुविधेसाठी निविदा सादर करावयाची असल्यास त्यासाठी सुविधानिहाय स्वतंत्र निविदा सादर करावी. निविदाधारकाने खालील पत्यावर विहित नमुन्यात दोन लिफाफ्यात प्रस्ताव सादर करावा.

लिफाफा १ – अर्ज व निविदाधारकांची माहिती, या लिफाफ्यावर “ फळे भाजीपाला निर्यात सुविधा /मॉडर्न मार्केट सेंटर/फुले निर्यात सुविधा करीता निविदा “ असे लिहावे.

लिफाफा २ – सुची २ नुसार आर्थिक प्रस्ताव – सदरचा लिफाफा सील करुन लिफाफा १ मध्ये टाकावा.

प्रति,
मा. कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,
प्लॉट नं. आर ७, मार्केट यार्ड, गुलटेकडी,
पुणे ४११०३७
फोन नं. ०२०/२४५२८१००, २४५२८२००
ईमेल - project@msamb.com

**६. प्रिबीड बैठक** – याबाबतची प्रिबीड बैठक दि.१५/७/२०१७ रोजी उपरोक्त कार्यालयात दुपारी ३.०० वाजता आयोजित केली आहे. याबाबत बैठकीस हजर राहणार असल्याची माहीती मेल द्वारे दि. १४/७/२०१७. रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत project@msamb.com वर कळवावी.

**७. प्रस्ताव सादर करणेची अंतिम तारीख**

निविदा धारकांनी उपरोक्त पत्यावर विहित नमुन्यात सीलबंद लिफाप्यात प्रस्ताव दि २१/०७/२०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वा पर्यंत सादर करावा.

# सूची - १

## <u>अर्जाचा नमुना</u>

**प्रति ,**

**मा. कार्यकारी संचालक**

**म.रा.कृ.पणन मंडळ, प्लॉट नं आऱ -७, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७**

| **अ.क्र.** | **तपशील** | **माहीती** |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | अर्जदाराचा पुर्ण पत्ता<br>फोन नं<br>ई मेल | |
| ३ | नोंदणी क्रमांक व नोंदणी वर्ष<br><br>(लागु असल्यास लिहावे) | |
| ४ | कोणत्या क्षेत्रात काम करीत आहात<br>( शेतकरी/कृषि विपणन/कृषि प्रक्रिया /निर्यातदार/रिटेलींग/पायाभुत सुविधा इ.) | |
| ५ | वार्षिक उलाढाल (मागील ३ वर्षाची) | |
| ६ | सध्या अशा प्रकारची कोणती सुविधा उभी केली असल्यास त्यांचे विविरण द्यावे. | |
| ७ | सध्याचे मनुष्यबळ किती आहे व त्यांचा अनुभव. | |
| ८ | यादीतील कोणत्या सुविधेकरीता निविदा भरत आहात. | |
| **९** | संपर्कासाठीचा पत्ता, फोन नं व ईमेल | |

मला आपल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. त्यास अधिन राहुन प्रस्ताव दाखल करीत आहे.

आपला विश्वासु,

नाव —

फोन नंबर

# सूची – २
## (बंद लिफाफ्यातुन मुळ प्रस्तावबरोबर सादर करावा)

## आर्थिक प्रस्ताव

| अ.क्र. | सुविधेचे नाव | वाषिक भाडे (रुपये) | वाषिक भाडे (शब्दात) |
|---|---|---|---|
| | | | |

**टिप - जर निविदा धारक एका पेक्षा जास्त सुविधांकरीता अर्ज करणार असल्यास प्रत्येक सुविधेकरीता वेगळा अर्ज भरावा.**

**प्राधीकृत अधिकारी स्वाक्षरी**

**कपंनीचा शिक्का**

# सूची – ३ सुविधांची यादी

| निर्यात सुविधा केंद्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **विभागीय कार्यालय** | **निर्यात सुविधा केंद्राचे नाव** | **स्थळ** | **शेतमाल** | **प्रकल्प किंमत रु. लाख** | **प्रकल्पातील घटक** | **क्षमता** |
| १ | रत्नागिरी | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे | गट नं.४४३, १/१/३, कृषि उत्पन्न बाजार समिती, रत्नागिरी, शांतीनगर, नाचणे रोड, ता. जि. रत्नागिरी | आंबा | १७४.०० | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / ६ तास |
| | | | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन |
| | | | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन |
| | | | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट (५५८ चौ.मी.) |
| | | | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास |
| | | | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ८०० नग |
| | | | | | | डी.जी. सेट | १०० KVA |
| | | | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA |
| २ | नाशिक | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा. | गट नं. ३२९, ३३०, ३३१, ३३२ , कृषि उत्पन्न बाजार समिती, रावेर, ता. रावेर जि. जळगाव | केळी | ३९९.०० | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / ६ तास |
| | | | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन |
| | | | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन |
| | | | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट (५३० चौ.मी.) |
| | | | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास |
| | | | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १५० नग |
| | | | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन |
| | | | | | | स्टाफ क्वार्टर्स | २ X १BHK |
| | | | | | | डी.जी. सेट | १४० KVA |
| | | | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA |
| **३** | पुणे | निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव | गट नं.३९८ ते ४०० , हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ जि. पुणे | फळे भाजीपाला | १३६.५१ | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / ६ तास |
| | | | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन |
| | | | | | | पॅकहाऊस | ८०० स्क्वे. फुट (५५८ चौ.मी.) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | नाशिक | कांदा , द्राक्ष व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, कळवण | गट नं. १३, मु.पो. भेंडी कळवण जि. नाशिक | कांदा, द्राक्ष, डाळींब | ९५०.५५ | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / ६ तास |
| | | | | | | कोल्ड स्टोरेज | २ X २५ मे.टन एकूण क्षमता ५० मे.टन |
| | | | | | | पॅकहाऊस | ४३५० स्क्वे. फुट X २ |
| | | | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन/तास |
| | | | | | | कांदा साठवणूक | ८ X ५०मे.टन एकूण क्षमता ४०० मे.टन |
| | | | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन |
| | | | | | | स्टाफ क्वार्टर्स | २ x१ BHK |
| | | | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग |
| | | | | | | डी.जी. सेट | १६० KVA |
| | | | | | | | ३० KVA |
| | | | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA |
| ५ | औरंगाबाद | केळी निर्यात सुविधा केंद्र वसमत | गट नं.१६७, तालुका बीज गुणन केंद्र ता. वसमत जि. हिंगोली | केळी | ३९९.०० | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / ६ तास |
| | | | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन |
| | | | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन/बॅच |
| | | | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट X २ (५३० चौ.मी.) |
| | | | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन/तास |
| | | | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १५० नग |
| | | | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन |
| | | | | | | स्टाफ क्वार्टर्स | २ x१ BHK |
| | | | | | | डी.जी. सेट | १४० KVA |
| | | | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA |
| ६ | कोल्हापूर | डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र आटपाडी | गट नं.३७१४, कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी ता. आटपाडी जि. सांगली | द्राक्ष, डाळींब | ५१२.४७ | प्रिकुलिंग | ५ मे. टन. |
| | | | | | | कोल्ड स्टोरेज | २ X २५ मे.टन (एकूण क्षमता ५० मे.टन) |
| | | | | | | पॅकहाऊस | २००० स्क्वे. फुट (१८९.५ स्कवे.मी.) |
| | | | | | | डी.जी. सेट | २०० KVA |
| | | | | | | ट्रान्सफॉर्मर | २०० KVA |
| | | | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ५०० नग |

| आधुनिक सुविधा केंद्र | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **७** | औरंगाबाद | घनसावंगी जि. जालना | गट नं. ६९१, कृषि उत्पन्न बाजार समिती, घनसावंगी जि. सांगली | फळे भाजीपाला | ३०२.३० | • कोल्ड स्टोरेज - २५ मे.टन<br>• प्रिकुलिंग - ५ मे.टन<br>• पॅक हाऊस एरिया - १०७.३० चौ.मी. ( ११५५ स्क्वे.फुट)<br>• डी.जी.सेट- ६२.५ KVA<br>• ट्रान्सफॉर्मर - १०० KVA<br>• अँन्टीरुम - ४२ चौ.मी.<br>• प्लँटरूम - ३९ चौ.मी.<br>• ऑफिस - ३२ चौ.मी.<br>• स्टोअर रूम - १७.३० चौ.मी.<br>• गाळे - ३ - ५४ चौ.मी.<br>• अंतर्गत रस्ते व संरक्षण भिंत, बाह्य विद्युतीकरण, प्लॅस्टिक क्रेट्स |
| **८** | औरंगाबाद | कळमनुरी जि. हिंगोली | गट नं. १९१, कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमनुरी, मुख्य बाजार कळमनुरी जि. हिंगोली | | २८५.४८ | |
| **९** | लातूर | माजलगाव जि. बीड | गट नं. ७(३), (४), (५), कृषि उत्पन्न बाजार समिती, माजलगाव मंजरथ रोडा ता. माजलगाव जि. बीड | | २७७.१३ | |
| **१०** | नाशिक | यावल जि. जळगाव | गट नं. ७५ व ७७ कृषि उत्पन्न बाजार समिती, मुख्य बाजार यावल ता. यावल जि. जळगाव | | २९१.०१ | |
| **११** | नाशिक | शिरपूर जि. धुळे | गट नं. १७९/१, कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूर जि. धुळे | | २७९.९९ | |
| **१२** | नागपूर | पुलगाव जि. वर्धा | गट नं. १३, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुख्य बाजार आवार ता. देवळी जि. वर्धा | | २९९.०६ | |
| **१३** | नागपूर | भिवापूर जि. नागपूर | गट नं. ७४२/२, कृषि उत्पन्न बाजार समिती, भिवापूर मौजा भिवापूर ता. भिवापूर जि. नागपूर | | २९७.५७ | |
| **१४** | नागपूर | मोहाडी जि. भंडारा | गट नं. १७७ व १७८/२, कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर वडेगाव मौजा ता. मोहाडी जि. भंडारा | | २९८.०१ | |
| **१५** | अमरावती | देऊळगाव राजा जि. बुलढाणा | गट नं. १६५, मौजे पिंपळनेर, ता. देऊळगाव राजा जि. बुलढाणा | | २८३.५८ | |

**पणन मंडळाची विभागीय कार्यालये**

**(सुविधांचा पाहणी करावयाची असल्यास संबंधित विभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा)**

| **अ.क्रं.** | **विभागीय कार्यालय** | उपसरव्यवस्थापक व विभागीय कार्यालय पत्ता | **फोन नं.** |
|---|---|---|---|
| १ | पुणे | डॉ. ए. एस. गार्डी,<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>बाजार समिती संघ इमारत<br>दुसरा मजला मार्केट यार्ड,<br>पुणे ४११ ०३७ | ०२०/२४२६३८७३ |
| २ | नाशिक | श्री. डी. डी. आहेर<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>गाळा नं. ६१८/६२३, पंचवटी, मार्केट यार्ड,<br>दुसरा मजला, गिरणा बँकेच्या वर,<br>दिंडोरी नाका, नाशिक ४०० ००३. | ०२५३-२२३२६७६ |
| ३ | औरंगाबाद | श्री. एम.एन.साळुंके पाटील<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>बाजार समिती शॉपिंग सेंटर,<br>पहिला मजला, जाफरगेटजवळ,<br>औरंगाबाद ४३१ ००१ | ०२४०/२३३४१६८ |
| ४ | लातूर | डॉ. शुभांगी एस. गोंड<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>आंबा व डाळींब सुविधा केंद्र,<br>प्लॉट नं. डी १/१, नवीन एम.आय.डी.सी.,<br>वखार महामंडळाचे गोदाम समोर, बार्शी रोड,<br>लातूर ४१३ ५३१ | ०२३८२/२१२०६१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | नागपूर | श्री. एम. एस. गवळे<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>नवी कॉटन मार्केट यार्ड,<br>एस.टी.  बस स्टेशन समोर,<br>गणेश पेठ, नागपूर ४४० ०१८ | ०७१२/२७२२९९७ |
| ६ | अमरावती | श्री. एल. बी.  मुंदडा<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>जुने कॉटन मार्केट आवार,<br>शेतकरी भवन, २ रा मजला,<br>अमरावती ४४४ ६०१. | ०७२१/२५७३५३७ |
| ७ | कोल्हापूर | श्री. ए. जे. पवार<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर<br>कोल्हापूर मल्टी पर्पज हॉल इमारत,<br>शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर  ४१६ ००५ | ०२३१/२६५०१६६ |
| ८ | रत्नागिरी | श्री. एम. के अहिरे<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,<br>कृषि उत्पन्न बाजार समिती, रत्नागिरी  शेजारी,<br>नाचणे रोड, शांतीनगर,<br>रत्नागिरी ४१५ ६३९ | ०२३५२/२२८३७७ |